दि. १ एप्रिल २००६ ते ३० एप्रिल २००६ या कालावधीत योग्य दराने कर गोळा न केलेल्या व्यापा-यांसाठी प्रशासकीय सवलती बाबत.

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांक विकअ-२००६/प्र.क्र. ७६/करा.-१/मंत्रालय मुंबई ४०० ०३२.
दिनांक २५मे २००६

**प्रस्तावनाः**

महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम २००२ ( २००५ चा महा.९) ला जोडलेल्या अनुसूची 'क' व अनुसूची 'ग'मधील काही वस्तू दि. १ मे २००५ ते ३१ मार्च २००६ या ११ महिन्यांसाठी करमुक्त वा यथास्थिती ४% दराने करपात्र होत्या.

दिनांक २७ एप्रिल २००६ रोजीच्या अधिसूचनेनुसार अनुसूची 'क' व अनुसूची 'ग' मध्ये सुधारणा करुन वरील वस्तूंना दिलेली करसवलत दि. १ मे २००६ ते ३० सप्टेंबर २००६ या ५ महिन्यांच्या कालावधीसाठी वाढविण्यात आली.

अनुसूची 'क' आणि अनुसूची 'ग' मधील बदल दि. १ मे २००६ पासून अंमलात आल्यामुळे मधल्या एक महिन्याच्या कालावधीमध्ये काही करदात्यांनी खरेदीदारांकडून योग्य दराने कर गोळा केलेला नाही.

सदर बाब लक्षात घेऊन, ज्या व्यापा-यांनी दि. १ एप्रिल २००६ ते ३० एप्रिल २००६ या कालावधीमध्ये जोडपत्रामध्ये दिलेल्या तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालावर योग्य त्या दराने कर गोळा केलेला नाही अशा व्यापा-यांसाठी प्रशासकीय सवलत देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. आता शासन खालील प्रमाणे प्रशासकीय सवलत मंजूर करण्याचा निर्णय घेत आहे:-

**शासन निर्णयः**

काही वस्तूंवर दि. १ एप्रिल २००६ रोजी लागू झालेला कराचा दर ४% किंवा १२.५% आहे. परंतु त्या वस्तूंवर दि. १ मे २००६ पासुन लागू असलेला कराचा दर कमी होऊन तो शुन्य टक्के किंवा यथास्थिती ४% झाला आहे.

आता असे ठरविण्यात येते की, दि. दि. १ एप्रिल २००६ ते ३० एप्रिल २००६ या कालावधीसाठी सदर वस्तूंच्या विक्रीसाठी संबंधित व्यापा-यांना खालीलप्रमाणे नमूद केलेल्या शर्तींचे अधीन राहून प्रशासकीय सवलत देण्यात येईल,

जर,-,

(१) संबंधित व्यापा-यांनी या कालावधीत कर गोळा केलेला नसेल,

(२) संबंधित व्यापा-यांनी या कालावधीत लागू असलेल्या दरापेक्षा कमी दराने कर गोळा केला असेल.

(३) संबंधित व्यापा-यांनी स्वतंत्रपणे कर गोळा न करता कराची रक्कम अंशत: भरली असेल.

तर वरील परिस्थितीत, प्रशासकीय सवलत, गोळा न केलेल्या अथवा न भरलेल्या कराच्या, दोहोंपैकी जी कमी असेल, त्या मर्यादेत दिली जाईल. परंतु ,

अ) व्यापाऱ्यांनी गोळा केलेल्या कराचा भरणा शासनाकडे पूर्णत: केला नसल्यास, उर्वरित कराची रक्कम व्याजासह कोषागारात शासन निर्णयापासून एक महिन्याचे आत शासनाकडे भरावी लागेल.

ब) व्यापाऱ्यांनी कर गोळा केला नसल्यास, १ मे २००६ नंतर त्या त्या वस्तूसाठी जो कराचा दर विहित झाला असेल, किमान त्या दराने , १ एप्रिल २००६ ते ३० एप्रिल २००६ या कालावधीसाठी त्या त्या वस्तूच्या विक्रीवरचा देय कर व व्याज शासन निर्णयापासून एक महिन्याचे आत कोषागारात भरावे लागेल.

क) प्रशासकीय सवलत मिळण्याकरिता व्यापाऱ्याने विवरणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

ड) तसेच, प्रशासकीय सवलत दिल्यामुळे कोणत्याही प्रकरणी परतावा दिला जाणार नाही.

**<u>प्रशासकीय सवलत मंजूर करणारी यंत्रणा:</u>**

या शासन निर्णयानुसार प्रशासकीय सहाय्य मंजूर करण्याचे अधिकार विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना देण्यात येत असून आवश्यकतेनुसार सदर अधिकार आयुक्तांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील अपर विक्रीकर आयुक्त, सह विक्रीकर आयुक्त, ज्येष्ठ विक्रीकर उपआयुक्त,

विक्रीकर उपआयुक्त,  सहाय्यक विक्रीकर आयुक्त व विक्रीकर अधिकारी यांना  प्रदान करण्याची परवानगी विक्रीकर आयुक्तांना देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

शशांक माथने
शासनाच विशेष कार्य
अधिकारी

# जोडपत्र

| अनु.क्र. | वस्तूचे नांव | दि. १ एप्रिल २००६ रोजी | | दि. १ मे २००६ रोजी | |
|---|---|---|---|---|---|
| | | अनुसूची क्रमांक | कराचा दर | अनुसूची क्रमांक | कराचा दर |
| १ | भात (साळी), तांदूळ, गहू व डाळी अखंड, फोडलेल्या किंवा भरडलेल्या स्वरुपातील. | ग-२० | ४% | क- ९ क (क) | ०% |
| २ | गहू व तांदळाचे पीठ, आटा, मैदा, रवा, सूजी यांसह | ग-३७(क) | ४% | क- ९ क (ख) | ०% |
| ३ | डाळींचे पीठ, बेसन सह (इतर डाळी किंवा धान्ये यांच्या पीठात न मिसळलेले) | ग-३७(ख ) | ४% | क- ९ क (ग) | ०% |
| ४ | पापड , खाण्यासाठी दिला असेल त्या व्यतिरिक्त | ग-१०७(११)(च) | ४% | क-५१(एक) | ०% |
| ५ | गूळ | ग-४० | ४% | क-५१(दोन) | ०% |
| ६ | मिरची, हळकुंड आणि चिंच अखंड, भुकटीच्या स्वरुपात किंवा वेगळ्या केलेल्या स्वरुपात (वेगळे काढून विकण्यात येणारे मिरचीचे बी व चिंचोके वगळून) | ग-९१(ख) | ४% | क-५१(तीन) | ०% |
| ७ | धणे, मेथ्या, पार्स्ली (सुवा) अखंड किंवा भुकटीच्या स्वरुपात | ग-९१(ख) | ४% | क-५१(चार) | ०% |
| ८ | असोला नारळ आणि सुक्या खोबऱ्याव्यतिरिक्त नारळापासून वेगळे काढलेले ओले खोबरे. | ग-१०६(ख) | ४% | क-५१(पाच) | ०% |
| ९ | सोलापूरी चादर | ङ | १२.५% | क-५१(सहा) | ०% |
| १० | टॉवेल्स | ङ | १२.५% | क-५१(सात) | ०% |
| ११ | खजूर | ङ | १२.५% | क-५१(आठ) | ०% |
| १२ | सुका मेवा आणि बेदाणे व मनुका | ङ | १२.५% | ग-१०८(क) | ४% |
| १३ | चहापत्ती किंवा चहा पावडर इन्स्टंट चहासह | ङ | १२.५% | ग-१०८(ख) | ४% |